क्र. का.प्रा.वि./आयसीडी/२०२०-२१/१८० दि. २० जानेवारी, २०२१

मसुदा

क्र.१०/२०२०-२०२१.

गोपनीय

व्यवस्थापन परिषद

# मुंबई विद्यापीठ

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२०-२०२१ मधील

## ११ जानेवारी, २०२१ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची दहावी बैठक **सोमवार, दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजी दुपारी २:०० वाजता** आयोजित करण्यात आली. कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर उद्भवलेल्या परिस्थितीमुळे सदर सभा क्लाऊड व्हिडियो मिटींग (ZOOM APP) द्वारे घेण्यात आली. सदर बैठकीस खालील मान्यवर सभासद उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरु) | अध्यक्ष |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरु) | सदस्य |
| ३. | डॉ. अनुराधा मजुमदार | सदस्य |
| ४. | प्रा. राजेश खरात | सदस्य |
| ५. | डॉ. कविता लघाटे | सदस्य |
| ६. | प्रा. (डॉ.) महादाप्पा गं. गोंडा | सदस्य |
| ७. | डॉ. वैभव नरवडे | सदस्य |
| ८. | डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| ९. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| १०. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य |
| ११. | प्रा. बि. एन. जगताप | सदस्य |
| १३. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| १४. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १५. | डॉ. बळीराम गायकवाड (कुलसचिव) | सदस्य सचिव |
| १६. | डॉ. विनोद पाटील (संचालक,परिक्षा व मुल्यमापन मंडळ) | निमंत्रित |
| १७. | डॉ. प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |

➢ **स्वागत**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम (३०) (४) (ड.) अन्वये कुलगुरूंनी नामनिर्देशित केलेले व्यवस्थापन परिषदेचे सदस्य म्हणून डॉ. कविता लघाटे, संचालक, जमनालाल बजाज व्यवस्थापन संस्था, मुंबई विद्यापीठ यांचे प्रथम बैठकीत स्वागत करण्यात आले.

कुलसचिव तथा सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करुन सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

➢ **अनुपस्थिती :-**

श्री. दिपककुमार मुकादम आणि डॉ. अजय भामरे यांनी त्यांची अनुपस्थिती कळविल्याने त्यांची अनुपस्थिती मंजूर करण्यात आली.

➢ **श्रध्दांजली**

**श्री धर्मपाल गुलाटी**

एमडीएच कंपनीचे मालक श्री धर्मपाल गुलाटी यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक ०३ डिसेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९८ वर्षांचे होते.

**श्री रवी पटवर्धन**

ज्येष्ठ मराठी अभिनेते श्री रवी पटवर्धन यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक ०५ डिसेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८४ वर्षांचे होते.

**श्री विष्णू सावरा**

आदिवासी विकास खात्याचे माजी मंत्री श्री विष्णू सावरा यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०९ डिसेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७२ वर्षांचे होते.

**श्री नरेंद्र भिडे**

प्रसिध्द संगीतकार श्री नरेंद्र भिडे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १० डिसेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ४७ वर्षांचे होते.

**श्री शंकर खंचनाळे**

पहिले हिंदकेसरी श्री शंकर खंचनाळे यांचे दिर्घ आजाराने दिनांक १४ डिसेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८६ वर्षांचे होते.

**श्री माधव गो. वैद्य**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी बौध्दीक व प्रचार प्रमुख ज्येष्ठ पत्रकार श्री माधव गोविंद वैद्य यांचे दिर्घ आजाराने दिनांक १९ डिसेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९७ वर्षांचे होते.

**श्री मोतीलाल व्होरा**

मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री व कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते श्री मोतीलाल व्होरा यांचे दिर्घ आजाराने दिनांक २१ डिसेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९३ वर्षांचे होते.

**कर्नल नरेंद्र बुल कुमार**

जगातील तिसरे उंच शिखर असलेल्या माउंट कांचेनजुंगा पहिल्यांदा भारतीय तिरंगा फडकविणा-या संघाचे नेते कर्नल (निवृत्त) नरेंद्र बुल कुमार यांचे अल्पशा आजाराने दिनांक ३१ डिसेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८७ वर्षांचे होते.

**डॉ. भा. रा. अंधारे**

ख्यातनाम इतिहास संशोधक डॉ. भा. रा. अंधारे यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०२ जानेवारी २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षाचे होते.

**श्रीमती मंगला भावे**

ज्येष्ठ लेखिका श्रीमती मंगला भावे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक ०३ जानेवारी २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७७ वर्षाच्या होत्या.

**श्री विलासकाका उंडाळकर**

कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी सहकार मंत्री श्री विलासकाका उंडाळकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०४ जानेवारी २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७२ वर्षाचे होते.

**श्री अशोक म्हात्रे**

मराठी चित्रपट निर्माते श्री अशोक म्हात्रे यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०६ जानेवारी २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६९ वर्षाचे होते.

सभेच्या सुरूवातीस मा. कुलगुरू यांनी सभागृहास अवगत केले की, विद्यापीठाने दिनांक २ जानेवारी, २०२१ रोजी नॅक SSR सादर केला आहे. व लवकरच नॅक समितीची भेट विद्यापीठास अपेक्षित आहे. त्यादृष्टीने व्यवस्थापन परिषदेच्या सर्व सभासदांना विविध जबाबदा-या दिल्या जातील आणि विद्यापीठाला चांगल मुल्यांकन मिळण्यासाठी सर्वांनी आपले योगदान दयावे अशी विनंती केली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र. १ | दिनांक २७ नोव्हेंबर, २०२० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दिनांक २७ नोव्हेंबर, २०२० रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र.२ | व्यवस्थापन परिषदेचा दिनांक २३ ऑक्टोबर, २०१९, २६ फेब्रुवारी, २०२०, ५ सप्टेंबर, २०२० आणि १३ ऑक्टोबर, २०२० चा कार्यवाही अहवाल. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | व्यवस्थापन परिषदेचा दिनांक २३ ऑक्टोबर, २०१९, २६ फेब्रुवारी, २०२०, ५ सप्टेंबर, २०२० आणि १३ ऑक्टोबर, २०२० च्या कार्यवाही अहवालांची नोंद घेण्यात आली. | |
| बाब क्र.३ | वित्त व लेखा समितीचे दिनांक २६ नोव्हेंबर, २०२० व ३० डिसेंबर, २०२० रोजीच्या सभेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव | वित्त व लेखा समितीचे दिनांक २६ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या सभेचे इतिवृत्त बाब क्र. ६ वगळून मान्य करण्यात आले व दिनांक ३० डिसेंबर, २०२० रोजीच्या सभेचे इतिवृत्त मान्य करण्यात आले. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र.४ | अध्यापक व कर्मचारी तक्रार निवारण समितीच्या बैठकीत पारित करण्यात आलेल्या १२ तक्रारींचे ठराव व्यवस्थापन परिषदेच्या माहिती करिता सादर. | तक्रार निवारण कक्ष |
| ठराव | अध्यापक व कर्मचारी तक्रार निवारण समितीच्या बैठकीत पारित करण्यात आलेल्या १२ तक्रारींच्या ठरावांची नोंद घेण्यात आली. | |
| बाब क्र.५ | दिनांक १६ मार्च, २०२० रोजी झालेल्या इमारत आणि बांधकाम समितीचे इतिवृत्त मंजूरीसाठी सादर. | विद्यापीठ क्षेत्र विकास विभाग |
| ठराव | दिनांक १६ मार्च, २०२० रोजी झालेल्या इमारत आणि बांधकाम समितीचे इतिवृत्त मान्य करण्यात आले. | |
| बाब क्र.६ | मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रूझ (पूर्व) परिसरात पोलिस चौकी उभारण्याकरिता जागा उपलब्ध करून देण्याबाबत मंजूरीसाठी सादर. | विद्यापीठ क्षेत्र विकास विभाग |
| ठराव | मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रूझ (पूर्व) परिसरात पोलिस चौकी उभारण्याकरिता जागा उपलब्ध करून देण्याबाबत मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र.७ | मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसर येथील जमिनीची मोजणी शासनाच्या नगर भूमापन विभागाकडून करणेबाबत. | विद्यापीठ क्षेत्र विकास विभाग |
| ठराव | मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसर येथील जमिनीची मोजणी शासनाच्या नगर भूमापन विभागाकडून करण्याबाबत मंजुरी देण्यात आली. मात्र सदर मोजणी काम कमीत कमी रक्कम आकारून करण्याबाबत नगर भूमापन विभागास पत्राने विनंती करावी व कमीत कमी खर्चात मोजणी करावी. | |
| बाब क्र.८ | मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरामध्ये व इतर जी विकास कामे करावयाची आहेत, त्याबाबत मा. राज्यपाल (महाराष्ट्र राज्य) आणि कुलपती (मुंबई विद्यापीठ) यांनी आढावा घेऊन काही सूचना दिलेल्या आहेत, त्या व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करणेबाबत. | विद्यापीठ क्षेत्र विकास विभाग |
| ठराव | सदरबाबत मा. कुलगुरू महोदयांनी सभागृहास माहिती दिली. चर्चेअंती सखोल अभ्यासाची आवश्यकता असल्याने सदर बाब सविस्तर माहितीसह व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत सादर करण्यात यावी असे ठरले. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र.९ | विद्यानगरी परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन समोरील मैदान दिनांक १० जानेवारी, २०२१ ते २६ मार्च, २०२१ (एकुण ७५ दिवस) या कालावधीत हिंदी चित्रपटाचे चित्रिकरण करण्यासाठी मंजुरी देणेबाबत. | सामान्य प्रशासन विभाग (विद्यानगरी ) |
| ठराव | सदरबाबत असा ठराव करण्यात आला की, नॅक समिती विद्यापीठास भेट देऊन गेल्यानंतर सदर चित्रिकरण करण्यासाठी संमती देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल असे सदर संस्थेस कळवावे. | |
| बाब क्र.१० | To execute various works at Fort and Kalina Campus in view of NAAC Accreditation. | Campus Development Unit |
| ठराव | मा. प्र-कुलगुरूंनी नॅक समितीच्या भेटीच्या अनुषंगाने फोर्ट व विद्यानगरी परिसर येथील विविध प्रलंबित/तातडीने करावयाच्या कामकाजांचा घेतलेला आढावा सभागृहासमोर माहितीस्तव सादर केला. यासाठी लागणा-या विविध प्राधिकरणांच्या मंजुरींसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केले जातील असे त्यांनी सांगितले. या निमित्ताने सर्व सदस्यांनी नॅकच्या विविध समित्यांमध्ये सक्रीय सहभाग दयावा असे मा. कुलगुरूंनी आवाहन केले. | |
| बाब क्र.११ | विश्वविद्यालय अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून एन.एस. क्यु.एफ. (National Skill Qualification Framework) यांच्यामार्फत बी.व्होक. व एम. व्होक. अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आलेल्या महाविद्यालयांचे प्रस्ताव शासनास पाठविण्यास मान्यता देण्याबाबत. | संलग्नता विभाग |
| ठराव | विश्वविद्यालय अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून एन.एस. क्यु.एफ. (National Skill Qualification Framework) यांच्यामार्फत बी.व्होक. व एम. व्होक. अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आलेल्या महाविद्यालयांचे प्रस्ताव शासनास पाठविण्यास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र.१२ | As per the provision made under section 130 of the Maharashtra Public University Act, 2016 a proposal for the Management Council to arrange the Convocation programme for the year 2020 for conferment of Degrees and Diplomas in different programmes of various faculties of the University, so | Exam Section |

| | | |
|---|---|---|
| | also, the courses conducted by the Autonomous Departments of the University and Autonomous Colleges/Institutions. | |
| ठराव | As per the provision made under section 130 of the Maharashtra Public University Act, 2016 a proposal placed before the Management Council to arrange the Convocation programme for the year 2020 for conferment of Degrees and Diplomas in different programmes of various faculties of the University, so also, the courses conducted by the Autonomous Departments of the University and Autonomous Colleges/Institutions, is accepted. | |
| बाब क्र.१३ | शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय साखरपा, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी हे महाविद्यालय विश्वास शिक्षण प्रसारक मंडळ, यशवंतनगर, चिखली, ता. शिराळा, जि. सांगली या संस्थेकडे हस्तांतर करण्याबाबत. | संलग्नता विभाग |
| ठराव | शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय साखरपा, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी हे महाविद्यालय विश्वास शिक्षण प्रसारक मंडळ, यशवंतनगर, चिखली, ता. शिराळा, जि. सांगली या संस्थेकडे हस्तांतर करण्याबाबतच्या प्रस्तावावर स्थानिक चौकशी समिती नेमून त्यांच्या अहवालानुसार कार्यवाही करावी असे ठरले. समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदार करण्यात आले. | |
| | अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेले विषय | |
| बाब क्र. १४ | सुमन एज्युकेशन सोसायटीचे एल.एन.कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड सायन्स (महिला) महाविद्यालयाने “सुमन एज्युकेशन सोसायटीचे एल.एन.कॉलेज ऑफ कॉमर्स, प्लॉट नं. ८९, जनरल खारीप्पा ब्रिज, राजेंद्र नगर, बोरीवली (पू), मुंबई-४०० ०६६” ऐवजी “सुमन एज्युकेशन सोसायटीचे वीना कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स, श्री क्रिष्णा शिक्षण प्रसारक मंडळ, ७९, श्री क्रिष्णा नगर, बोरीवली (पू), मुंबई-४०० ०६६” नावात बदल करण्यासाठी व स्थलांतर करण्यासाठी पुर्नसादर केलेल्या प्रस्तावाबाबत. | संलग्नता विभाग |

| | | |
|---|---|---|
| ठराव | सुमन एज्युकेशन सोसायटीचे एल.एन.कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड सायन्स (महिला) महाविद्यालयाने "सुमन एज्युकेशन सोसायटीचे एल.एन.कॉलेज ऑफ कॉमर्स, प्लॉट नं. ८९, जनरल खारीप्पा ब्रिज, राजेंद्र नगर, बोरीवली (पू), मुंबई-४०० ०६६" ऐवजी "सुमन एज्युकेशन सोसायटीचे वीना कॉलेज ऑफ आर्टस,कॉमर्स ॲन्ड सायन्स, श्री क्रिष्णा शिक्षण प्रसारक मंडळ, ७९, श्री क्रिष्णा नगर, बोरीवली (पू), मुंबई-४०० ०६६" नावात बदल करण्यासाठी व स्थलांतर करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र.१५ | सचिव शारदा एज्युकेशन सोसायटीचे, आनंद विश्व गुरुकुल कॉलेज ऑफ लॉ यांचा "हायलॅडपार्कच्या मागे, टीएसीऑटरटॅक धोकळी जवळ, ठाणे-४०० ६०७" येथुन "टीएमसी स्कुल नं. १८, मेंटल हॉस्पीटल जवळ, ए सी सी सिमेंट कॉलनी जवळ, ठाणे (प)-४०० ०६४" येथे स्थलांतर करण्याबाबतचा प्रस्ताव. | संलग्नता विभाग |
| ठराव | सचिव शारदा एज्युकेशन सोसायटीचे, आनंद विश्व गुरुकुल कॉलेज ऑफ लॉ यांचा "हायलॅडपार्कच्या मागे, टीएसीऑटरटॅक धोकळी जवळ, ठाणे-४०० ६०७" येथुन "टीएमसी स्कुल नं. १८, मेंटल हॉस्पीटल जवळ, ए सी सी सिमेंट कॉलनी जवळ, ठाणे (प)-४०० ०६४" येथे स्थलांतर करण्याबाबतचा प्रस्तावास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र.१६ | विद्यापीठ अधिकार मंडळावरील निवडणुकांसाठी नियुक्त केलेल्या विद्यापीठातील/महाविद्यालयातील सेवकांना मानधन मंजूर करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या दि. ६ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या ठरावानुसार सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव पुन:श्च सादर. | निवडणूक विभाग |
| ठराव | सदर बाबत प्रत्येक अधिकारी/कर्मचारीनिहाय किती रक्कम अदा करावयाची आहे, याचा तपशील निवडणूक विभागाने सादर करावा असे सांगण्यात आले. | |
| बाब क्र.१७ | दिनांक १३ ऑगस्ट, २०२० रोजीच्या बाब क. ३ च्या ठरावानुसार ॲड. निल हेळेकर यांचा एक सदस्यीय समिती अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | विधी कक्ष |

| | | |
|---|---|---|
| ठराव | ॲड. निल हेळेकर यांनी त्यांचा एक सदस्यीय समिती अहवाल (तक्ता) सभागृहास सादर केला व विषदही केला. चर्चेअंती विद्यापीठाच्या पॅनलवरील वकिलांना दयावयाचे सुधारीत मानधन या तक्त्यानुसार १ जानेवारी, २०१९ पासून मंजूर करण्यात आले. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

25.01.2021 29/1/2021 20/1/21

कुलसचिव

उपकुलसचिव

प्र-कुलगुरू

**इतिवृत्त मंजूर**

कुलगुरू

25 JAN 2021